# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

## स्वच्छता स्टार रँकिंग स्पर्धेअंतर्गत मिरा-भाईंदर महानगरपालिका आयुक्त यांची शहरातील सोसायट्यांना सदिच्छा भेट

मिरा भाईंदर शहर  स्वच्छ आणि सुंदर होण्यासाठी तसेच नागरिकांमध्ये स्वच्छतेची जागृती करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या उपस्थितीत सुरू झालेल्या स्वच्छता स्टार रँकिंग स्पर्धेला मिरा भाईंदर शहरातील सोसायटी, शाळा, हॉस्पिटल, हॉटेल्स, शासकीय कार्यालय, महाविद्यालय आणि मार्केट यांना मार्गदर्शन व स्टार रँकिंग बाबत संबोधित करण्यात आले. या स्पर्धेत विजयी स्पर्धकाला प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाना रोख रक्कम, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्रक देण्यात येणार आहे.

मा. आयुक्त यांनी MICL कॉम्प्लेक्स, स्कायलाईन कॉम्प्लेक्स आणि सृष्टी कॉम्प्लेक्स अशा तीन नागरी वसाहतींना सदिच्छा भेट देत कचरा विलगीकरण, कॉम्प्लेक्स परिसरातील स्वच्छता तसेच RRR सेंटर संबंधित नागरिकांना विशेष मार्गदर्शन केले आणि स्वच्छता स्टार रँकिंग दिलेल्या उल्लेखनीय प्रतिसादाबद्दल आभार व्यक्त केले. यामध्ये मा. आयुक्त यांनी RRR center अंतर्गत  Know your donation हा उपक्रम सोसायट्यांनी राबवुन मूल्यवान वस्तुंचे Donation गरजू व्यक्तिंना करावे असे  आवाहन केले. स्वच्छता स्टार रँकिंग स्पर्धेत घनकचरा वर्गीकरण, शौचालय व्यवस्थापन, परिसरातील स्वच्छता व इतर नाविन्यपूर्ण गोष्टीसाठी सर्व आस्थापनांना 1 स्टार, 3 स्टार, 5 स्टार आणि 7 स्टार अशा प्रकारची स्टार रँकिंग देण्यात येणार आहे. सदर स्पर्धेमध्ये 153 शाळा, 85 हॉटेल, 270 गृहनिर्माण संस्था, 28 हॉस्पिटल, 10 शासकीय कार्यालय व 1 मार्केट इतक्या आस्थापनांनी सहभाग नोंदवला आहे. यापुढेही मिरा-भाईंदर शहर प्रदूषण मुक्त तसेच आणखीन स्वच्छ आणि सुंदर कसे होईल याचा विचार करून जे जे उपक्रम महापालिकामार्फत राबविण्यात येतील त्या उपक्रमात असेच उत्कृष्ट सहकार्य करावे असे आवाहन मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी केले.